N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** गोरेगांव **Year (वर्ष):** 2023
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0108 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/07/2023 05:33 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** बुधवार
      **Time Period (कालावधी):** पहर 6
      **Date From (दिनांक पासून):** 19/07/2023
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/07/2023
      **Time From (वेळेपासून):** 17:18 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:20 बजे

   **(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 20/07/2023 **Time (वेळ):** 05:00 बजे

   **(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/07/2023 05:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.5 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

   **(b) Address (पत्ता):** गोरेगाव ,माणगाव

   **(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   **(a) Name (नाव):** संजय राजाराम कदम
   **(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   **(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   **(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   **(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   **(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   **(h) Address (पत्ता):**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वाकी बुद्रुक गावठाण,महाड,गोरेगांव,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वाकी बुद्रुक गावठाण,महाड,गोरेगांव,रायगड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणेश तुकाराम पाचपोहे | | | 1. 02/1203, व्हर्टेक्स सालीटेअर , वायले नगर , कल्याण पश्चिम,ठाणे , ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रथम खबर अहवाल गोरेगाव

दिनांक 19/07/2023

मी संजय राजाराम कदम, वय-49 वर्षे, रा.वाकी बुद्रुक गावठाण ता.महाड,जि.रायगड (मोबाईल नंबर 9021006862, 9028378840) समक्ष अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग कार्यालय येथे हजर राहून खबर लिहून देतो की,

मी वरील ठिकाणचा रहिवासी असून माझे वाकी बुद्रुक गावठाण ता.महाड येथील गुरांच्या वाडयासाठी लाईट कनेक्शन मिळणेसाठी तिथे नविन पोल मिळणेकरीता तसेच एक पोल माझे घराला लागून असल्याने तो पोल हलवून मिळणेकरीता व त्यासाठी होणारा खर्च मी करणार असलेबाबत सहायक अभियंता, एम.एस.ई.बी.बिरवाडी, ता.महाड यांना 06/07/2023 रोजी अर्ज केला होता. सदरचा अर्ज एम.एस.ई.बी.महाड कार्यालयाकडून एम.एस.ई.बी.कार्यकारी अभियंता, गोरेगाव ता.माणगाव जि.रायगड कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता.
सदर अर्जाचे अनुषंगाने एम.एस.ई.बी.गोरेगाव कार्यालयाचे कार्यकारी अभियंता श्री.पाचपोहे यांची दिनांक 17/07/2023 रोजी भेट घेवुन चर्चा केली असता त्यांनी गुराचे वाडयासाठी लाईट कनेक्शनसाठी नविन पोल तसेच घरालगत असलेला पोल हलविण्याची मंजूरी देणेसाठी 5,000/- रूपये दयावे लागतील असे मला म्हणाले. तरी मला श्री.पाचपोहे, कार्यकारी अभियंता,एम.एस.ई.बी. गोरेगाव यांस लाच देण्याची इच्छा नसून लाच मागणी प्रकरणी श्री.पाचपोहे यांचेविरूध्द कारवाई होणेकरीता मी दिनांक 17/07/2023 रोजी महाड येथे पोलीस उप अधीक्षक,श्री.पाडावे यांचेकडे तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 18/07/2023 रोजी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल बाबत सुचना देवुन मला वीर रेल्वे स्टेशन येथे हजर रहाण्याबाबत सुचना दिल्या.

माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 18/07/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक,श्री.पाडावे हे वीर रेल्वे स्टेशन येथे सापळा पथकासह व दोन शासकीय पंच 1) श्री.मंगेश ओंकार चैधरी, सहा.मोटार वाहन निरीक्षक, आर.टी.ओ.कार्यालय, पेण 2) श्री.सिध्देश्वर राजाराम घुले, कनिष्ठ लिपिक,आर.टी.ओ.कार्यालय,पेण यांचेसह हजर झाले. पोलीस उप अधीक्षक,श्री.पाडावे यांनी त्यांचेशी ओळख करून दिली. तसेच पथकातील अंमलदार यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक,श्री.पाडावे यांनी मला सांगितले की, मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरुध्द लाचेचा सापळा

आजमाविण्यात येईल बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक,श्री.पाडावे यांनी पडताळणीचे कार्यवाहीबाबत आम्हास व पंचांस माहिती देवून योग्य त्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे 11.45 वा. माझी व पंचांची वक्तव्य डिजिटल व्हाईस रेका◌ॅर्डरध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक,श्री. पाडावे यांनी पडताळणीकरीता खाजगी इन्होवा कार क्रमांक एमएच48-अ◌े-7690 या वाहनाने पंच नं.1 श्री.मंगेश चैधरी यांचेसह लोकसेवक श्री.पाचपोहे, कार्यकारी अभियंता, एम.एस.ई.बी.गोरेगाव कार्यालय, यांना भेटणेकरीता एम.एस.ई.बी.गोरेगाव कार्यालयामध्ये जाण्याच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी सुमारे 11.52 वाजता माझे कडे व्हाईस रेका◌ॅर्डर सुरू करून देण्यात आले. खाजगी इन्होवा कार क्रमांक एमएच48-अ◌े-7690 या वाहनाने पंच नं.1 श्री.मंगेश चैधरी यांचेसह कार्यकारी अभियंता,एम.एस.ई.बी. गोरेगाव कार्यालयामध्ये गेलो. तेथे लोकसेवक श्री.पाचपोहे, कार्यकारी अभियंता हे हजर होते. त्यांना मी माझे गोठयाचे नविन मिटरसाठी पोल मिळणेबाबत व घरालगत असलेला पोल हलविण्याबाबत विनंती केली असता, त्यांनी कागदाचे तुकडयावर सात हजार असा आकडा लिहून सात हजार रूपयांची लाचेची मागणी केली. तेंव्हा मी सात हजार रूपये का असे विचारले असता ते "डन" असे म्हणाले. त्यानंतर मी आणि पंच श्री. ओकांर चैधरी असे खाजगी इनोव्हा कारने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेका◌ॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक,श्री.पाडावे यांनी सदर संभाषणावरून लोकसेवक श्री.पाचपोहे, कार्यकारी अभियंता, एम.एस.ई.बी.कार्यालय, गोरेगाव यांनी माझे गोठयाचे नविन मिटरसाठी पोल मिळणेबाबत व घरालगत असलेला पोल हलविण्याबाबतचे अर्जास मंजूरी देण्याकरीता 7000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले असल्याने लोकसेवक श्री.पाचपोहे, कार्यकारी अभियंता, एम.एस.ई.बी.कार्यालय, गोरेगाव यांच्याविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्याचे ठरवुन लाचेची रक्कम रूपये 7000/- रूपये देणेबाबत मला सुचना दिल्या. त्याप्रमाणे माझे कडील 500/-रू.दराच्या 14 नोटा असे 7000/- रूपये सापळा कारवाईकरीता पोलीस उप अधीक्षक,श्री.पाडावे यांचेकडे हजर केल्या. त्यानंतर सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली त्यामध्ये मला व पंचाना अ◌ॅन्था◌ॅसिन पावडर लावण्याचे प्रात्याक्षिक करून दाखविले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी मला सापळा कारवाई करणेकरीता पाठविणेपुर्वी लोकसेवक श्री.पाचपोहे हे कार्यालयात हजर आहेत अगर कसे याची खात्री करण्यासाठी माझे मोबाईलवरून लोकसेवक श्री.पाचपोहे यांचे मोबाईलवर फोन करण्याबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी माझा मोबाईल नंबर 9021006862 यावरून माझे मोबाईलमध्ये सेव्ह असलेला लोकसेवक श्री.पाचपोहे यांचा फोन नंबर 7875765888 या नंबरवर 15-52 वाजता पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांच्या सुचनेवरून फोन लावला. सदरचा फोन लावताना मी फोनचा लाऊडस्पिकर आ◌ॅन केला. मी लोकसेवक श्री.पाचपोहे यांना आ◌ॅफिसला येवू का असे विचारले असता लोकसेवक श्री.पाचपोहे यांनी ते महाडला पोहचले असल्याचे सांगुन मला महाडला येण्यास व भेटण्यास सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

वरील संभाषणाच्या अनुषंगाने पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी लोकसेवक श्री.पाचपोहे हे महाड येथे गे◌ेले असून भेटण्याकरीता महाड येथे बोलाविल्याचे निष्पन्न झाले असल्याने महाड येथे जावून सापळा कारवाई आजमाविण्यांत येणार असल्याचे सं◌ागितले.

त्यानंतर खाजगी इनोव्हा गाडी नं. एमएच-48/अ◌े-7690 मध्ये पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे, मी तसेच सफौ.श्री.करकरे, सफौ.श्री. जाधव, पोह/2180 पाटील, पंच श्री.चैधरी, चालक संजय मारूती पाटील, असे तसेच शासकिय बोलेरो जिप क्रमांक एमएच-06-सीडी-1508 मध्ये पो.नि.गलांडे, पोह/खंडागळे, पंच श्री.घुले, व चालक ग्रेड पोसई श्री.घरत असे आम्ही सर्व जण 16-20 वाजता विर रेल्वेस्टेशन येथून निघून दासगांव मार्गे 16-38 वाजताचे सुमारास नातेखिंड येथे पोहचल्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांचे सुचनेवरून मी माझा मोबाईल नंबर 9021006862 यावरून माझे मोबाईलमध्ये सेव्ह असलेला लोकसेवक श्री.पाचपोहे यांचा फोन नंबर 7875765888 या नंबरवर 16-41 वाजता फोन लावला सदरचा फोन लावताना मी माझे फोनचा लाऊडस्पिकर आ◌ॅन केला. सदरचा फोन कनेक्ट झाला व फोनची रिंग वाजली परंतु लोकसेवक श्री.पाचपोहे यांनी का◌ॅल रिसीव्ह केला नाही. सदरचे संभाषण डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी नातेखिंड येथे थांबण्याचे ठरवून थोडयावेळाने पुन्हा लोकसेवक श्री.पाचपोहे यांना का◌ॅल करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 9021006862 यावरून माझे मोबाईलमध्ये सेव्ह असलेला लोकसेवक श्री.पाचपोहे यांचा फोन नंबर 7875765888 या नंबरवर 17-31 वाजता पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांच्या सुचनेवरून फोन लावला सदरचा फोन लावताना मी माझे फोनचा लाऊडस्पिकर आ◌ॅन केला. सदरचा फोन कनेक्ट झाला.

लोकसेवक श्री.पाचपोहे आपण महाड येथे आलो असल्याचे व ते कापडे येथे असल्याचे सांगुन काम आटोपल्यावर बघतो असे सांगितले. त्यावर मी अध्र्या तासाने का◌ॅल करू का असे विचारले असता हो असे सांगुन फोन कट केला. सदर संभाषण डिजिटल व्हाईस रेका◌ॅर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी नातेखिंड येथे थांबण्याचे ठरवून अध्र्या तसाने पुन्हा लोकसेवक यांना मोबाईलवर संपर्क करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही नातेखिंड येथे थांबून राहिलो.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी मला माझे मोबाईल नंबर 9021006862 यावरून माझे मोबाईलमध्ये सेव्ह असलेला लोकसेवक श्री.पाचपोहे यांचा फोन नंबर 7875765888 या नंबरवर 18-49 वाजता फोन लावला सदरचा फोन लावताना मी माझे फोनचा लाऊडस्पिकर आ◌ॅन केला. सदरचा फोन कनेक्ट झाला परंतू लोकसेवक श्री.पाचपोहे यांचा मोबाईल नेटवर्क कव्हरेज क्ष◌े◌त्राच्या बाहेर असल्याचे दिसून आले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेका◌ॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी लोकसेवक श्री.पाचपोहे यांचा मोबाईल नेटवर्क कव्हरेज क्ष◌े◌त्राच्या बाहेर असल्याचे दिसून येत असल्याने व ते कापडे, ता.पोलादपुर येथून कधी परत येतील याबाबत नक्की सांगता येणार नसल्याचे तसेच कार्यालयीन वेळ निघून

गेली असल्याने लोकसेवक भेटतील या बत खात्री नसल्याने आजची सापळा कारवाई स्थगिती करण्यात येणार असून सापळयाची पुढील कार्यवाही दिनांक 19/07/2023 रोजी करण्यात येणार असल्याबाबत व मला ढालघर फाटा ता.माणगाव येथे सकाळी 13.30 वा. हजर रहाण्याच्या सुचना दिल्या.

पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे दिनांक 19/07/2023 रोजी 13.30 वा.मी ढालघर फाटा,ता.माणगाव येथे हजर राहीलो असता, 13.45 वाजता पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे तसेच दोन पंच व सापळा पथकामधील अधिकारी व अंमलदार शासकीय पोलीस वाहन व खाजगी इनोव्हा कारने ढालघर फाटा येथे आले. त्यानंतर पो.उप अधीक्षक श्री. पाडावे यांनी दिनांक 18/07/2023 रोजी स्थगित करण्यात आलेली सापळा कारवाई करण्यात येणार असलेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.उप अधीक्षक श्री. पाडावे यांचे सूचनेवरुन दि.18/07/2023 रोजी ताब्यात घेण्यात आलेल्य अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या 7000/-रू.दराच्या नोटा सिलबंद लखोटयातुन बाहेर काढुन पुन्हा माझे पॅन्टच्या हिपपाॅकेट मध्ये ठेवण्यात आल्या.त्यानंतर दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. नंतर पो.उप अधीक्षक श्री. पाडावे यांनी 14-15 वाजता माझी वक्तव्ये डिजिटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली.

त्यानंतर पो. उप अधीक्षक श्री. पाडावे यांचे सूचनेप्रमाणे खाजगी इनोव्हा कारमध्ये पो.उप अधीक्षक श्री. पाडावे, मी, दोन्ही पंच, सफौ/करकरे, सफौ/जाधव व चालक संजय मारूती पाटील तसेच शासकीय जीपमध्ये पोनि/श्री.गलांडे, पोह/पाटील, पोना/आटपाडकर व चालक श्री.घरत असे 14-34 वाजता ढालघर फाटा, ता. माणगाव येथून गोरेगाव चे दिशेने रवाना झालो.

त्यानंतर दोन्ही वाहने मौजे लोणेरे फाटा आल्यानंतर पो.उप अधीक्षक श्री. पाडावे यांचे सूचनेप्रमाणे डिजिटल व्हाईस रेकाॅर्डर चालू करून तो होल्डवर ठेवून माझे शर्टच्या समोरील डावे खिशात ठेवून दिला. त्यानंतर दोन्ही वाहने लोणेरे फाटा येथून गोरेगाव रोडने आत आल्यावर डैम्ठ आॅफिस गोरेगाव येथे आल्यावर दोन्ही वाहने रस्त्याचे कडेला थांबवण्यात आली. त्यानंतर पो. उप अधीक्षक श्री. पाडावे यांनी मला व पंच नं. 1 श्री. चैधरी यांना कारमधून उतरून डैम्ठ आॅफिस गोरेगाव कार्यालयात जाण्याचा इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच नंबर 1 श्री.चैधरी असे इनोव्हा कारमधून उतरून डैम्ठ आॅफिस गोरेगाव कार्यालयाडे पायी चालत गेलो. आमचे मागोमाग पो. उप अधीक्षक श्री. पाडावे सापळा पथकातील अधिकारी/अंमलदार व पंच नं. 2 श्री. घुले असे दोन्ही वाहनातुन उतरून डैम्ठ आॅफिस गोरेगाव कार्यालयाचे आजुबाजुचे परिसरात कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा रचून थांबून राहीले.

मी व पंच नंबर 1 श्री.चैधरी असे डैम्ठ आॅफिस गोरेगाव कार्यालयात जावुन तेथील कर्मचारी यांचेकडे लोकसेवक श्री.पाचपोहे यांचेबाबत विचारणा केली असता ते बाहेर गेले असल्याचे सांगितले. त्यावेळी मी माझे मोबाईल क्रमांक 9021006862 वरून श्री. पाचपोहे यांचे मोबाईल क्रमांक 7875765888 या क्रमांकावर फोन केला. व फोन कनेक्ट होताच माझा फोन लाऊड स्पीकरवर ठेवला. त्यावेळी श्री. पाचपोहे यांनी फोन उचलला असता मी त्यांना आॅफिसला आलो असल्याचे सांगितले व त्यांना कधी येणार असे विचारले? त्यावेळी श्री. पाचपोहे यांनी ते एक ते दिड तासानी आॅफिसला येतील असे सांगून मला आॅफिसमध्येच थांबून राहण्यास सांगितले. त्यामुळे श्री. पाचपोहे यांना येण्यास उशीर होणार असल्याने मी व पंच नं. 1 श्री. चैधरी असे कार्यालयाचे बाहेर येवून सापळा पथकाजवळ आलो.सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकाॅर्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे सापळा पथकासह मी,पंच असे मौजे तळेगाव, ता. माणगाव येथे मुंबई-गोवा हायवे रोडलगत कोणास संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहीलो.

त्यानंतर सुमारे 16-00 वाजता पो. उप अधीक्षक श्री. पाडावे यांचे सूचनेप्रमाणे खाजगी इनोव्हा कारमध्ये पो.उप अधीक्षक श्री. पाडावे, मी, दोन्ही पंच, सापळा पथकामधील अधिकारी व अंमलदार असे आम्ही सर्व मौजे तळेगावं, ता. माणगाव येथून गोरेगाव चे दिशेने रवाना झालो.

त्यानंतर दोन्ही वाहने मौजे लोणेरे फाटा आल्यानंतर पो. उप अधीक्षक श्री. पाडावे यांचे सूचनेप्रमाणे माझे डिजिटल व्हाईस रेकाॅर्डर चालू करून माझे शर्टच्या समोरील डावे खिशात ठेवून दिला. त्यानंतर दोन्ही वाहने लोणेरे फाटा येथून गोरेगाव रोडने आत आल्यावर डैम्ठ आॅफिस गोरेगाव येथे आल्यावर दोन्ही वाहने रस्त्याचे कडेला थांबवण्यात आली. त्यानंतर पो. उप अधीक्षक श्री. पाडावे यांनी मला व पंच नं. 1 श्री. चैधरी यांना कारमधून उतरून डैम्ठ आॅफिस गोरेगाव कार्यालयात जाण्याचा इशारा केला.

त्याप्रमाणे मी व पंच नंबर 1 श्री.चैधरी असे इनोव्हा कारमधून उतरून डैम्ठ आॅफिस गोरेगाव कार्यालयाडे पायी चालत गेलो. आमचे मागोमाग पो. उप अधीक्षक श्री. पाडावे व सापळा पथकामधील अधिकारी व अंमलदार हे डैम्ठ आॅफिस गोरेगाव कार्यालयाचे आजुबाजुचे परिसरात कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा रचून थांबून राहीले.

मी व पंच क्र.1 श्री. चैधरी असे डैम्ठ आॅफिस गोरेगाव कार्यालयामध्ये लोकसेवक श्री.पाचपोहे,कार्यकारी अभियंता यांचे केबीनला जावुन त्यांची भेट घेवुन माझे गोठयाचे पोल संदर्भात व घरालगत असणा-या पोलला हलविण्याएसंदर्भातील कामाबाबत चर्चा केली. व त्यांनी मागणी केलेली 7,000/-रूपये लांचेची रक्कम लोकसेवक श्री.पाचपोहे यांचेकडे दिली. ती लोकसेवक श्री.पाचपोहे यांनी त्यांचे पॅन्टचे उजवे खिशातील पाकीटमध्ये ठेवली. त्यानंतर मी व पंच श्री.चैधरी अये डैम्ठ आॅफिस गोरेगाव कार्यालयाचे बाहेर येवून सापळा पथकास माझे डावे हाताने उजवे हाताचे शर्टची बाही वर करून लोकसेवक श्री.पाचपोहे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला. त्यावेळी सुमारे 17::18 वाजण्याचे सुमारांस अॅन्टी करप्शन पथकाने लोकसेवक श्री.पाचपोहे यांना रंगेहाथ पकडले.

अषा रितीने माझे गोठयाचे नविन नविन मिटरसाठी पोल मिळणेबाबत व घरालगत असलेला पोल हलविण्याबाबतचे अर्जास मंजूरी देण्याकरीता श्री.गणेश तुकाराम पाचपोहे,कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोरेगाव यांनी दिनांक 18/07/2023 रोजी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष त्यांचे कार्यालयामध्ये 7,000/- रूपये लाचेची मागणी लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. व दिनांक 19/07/2023 रोजी 17.18 वाजता माझेकडून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोरेगाव येथे कार्यकारी अभियंता यांचे केबिन मध्ये पंच साक्षीदारांसमक्ष लोकसेवक श्री.गणेश तुकाराम पाचपोहे,कार्यकारी अभियंता यांनी 7,000/- रू.लाचेची रक्कम स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांचेकडून लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे.

म्हणुन माझी श्री.गणेश तुकाराम पाचपोहे, वय 55 वर्षे, कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोरेगाव ता.माणगाव जिल्हा-रायगड, रा.ठि.व्हर्टेक्स साॅलीटर,फ्लॅट नं.ए2/1203,वारले

ही फिर्याद दिली, सही दि. 20/07/2023

( संजय राजाराम कदम )

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SHRIKRISHNA SAMBHAJI NAWALE(I (Inspector)) / 1234 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SHRIKRISHNA SAMBHAJI NAW
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 1234

ठाणे अमलदार
गोरेगांव पोलीस ठाणे
5f4we
H4989